**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – निर्मला अशोक निखाडे,

वय. ५० वर्षे, व्यवसाय – गृहिणी,

निवासस्थान – सारंगा टॉकिजजवळ, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील.**

माझ्या घरी मी, माझे पती, मुलगा आकाश व अंशुल असे सोबत राहतो. माझ्या घराच्या बाजुला टॉकिज, सावकार यांचे घर व आमचेच निखाडे नावाच्या लोकांचे घर आहे. घटना अंदाजे चार वर्षांपुर्वी माझे घरी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास घडली होती. त्यावेळी मी घरीच होते. माझा मुलगा आकाश याने दार उघडले असता निगम निखाडे यांनी विट फेकुन मारली. त्यानंतर माझ्या घराच्या आतमध्ये सात लोकं आले. त्यामध्ये आशिष, हेमु, सागर, निगम, लकी व लकीचे वडील होते. तसेच एक अनोळखी देखिल होता. मला आशिष, हेमु व सागर यांनी मारहाण केली. हेमुने माझे केसं ओढले. सागरने माझी साडी खेचली. त्या तिघांच्यामुळे माझ्या गळ्यातील सोन्याची गाढी तुटली. त्यानंतर आशिष निखाडे याने माझ्या लहान मुलगा अंशुल याचा मोबाईल हिसकला. त्याला निगम, लकी, लकीचे पप्पा व एका अनोळखी व्यक्तीने मारहाण केली. त्यानंतर त्यांनी आम्हाला घराबाहेर नेण्यात आले. तेथे सुध्दा मारहाण करण्यात आली. आशिष निखाडे याने तुम्ही आमचे काही करू शकत नाही अशी धमकी दिली. त्यानंतर आम्ही पोलिस ठाण्यात गेलो. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली होती. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. तो मी ओळखते. फिर्याद मधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७४** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. तो मी ओळखते. त्यातील मजकुर सुध्दा खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७५** देण्यात येते. माझ्या घरी जे इसम आले होते त्यांना मी ओळखु शकते. त्यापैकी आज चार इसम न्यायालयात हजर आहे. त्यांना मी ओळखते. इतर लोकांना दाखविल्यास त्यांना मी ओळखु शकते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. माटे यांच्यामार्फत</u>** –

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या उत्तर व दक्षिण बाजुला मुख्य रस्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या दक्षिण बाजुला शिवकुमार निखाडे यांचा पानठेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिवसभर तेथे लोकं बसुन असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीचे कुटूंब एकच आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आशिष ज्या जागेत राहतो ती जागा माझे सासरे व आत्माराम निखाडे यांनी त्यास विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या जागेवर त्याने घर बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरित जागचे वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जे नवीन बांधकाम सुरू केले होते त्यावरून वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आशिषने माझे पती विरूध्द न्यायालयात दावा देखिल दाखल केला होता. माझे सासरे व आरोपी आशिषचे वडील यांच्यामध्ये झालेल्या तथाकथीत वाटपाबाबत लिखान नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी राहत असलेली जागा आरोपी आशिषने त्याच्या नावावर करून घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतची फिर्याद दाखल केली त्यावेळी आशिषने दाखल केलेला दिवाणी दावा न्यायालयात प्रलंबित होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याने दाखल केलेल्या दिवाणी दाव्यामुळे माझ्या घराचे बांधकाम बंद आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, हर्षल पडोळे हे माझ्या लहान मुलीचे दिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, रफिक शेख हे माझा मुलगा आकाश याचा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, जयंत बघेले हे माझ्या मुलगा अंशुल याचे मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यादिवशी फिर्याद दाखल केली त्यादिवशीच सकाळी भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी रफिक शेख, हर्षल पडोळे यांनी आशिष निखाडे व शिवकुमार यांना मारहाण केली होती. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, हर्षल पडोळे नव्हता जयंत बघेले होता. हे म्हणणे खरे नाही की, जयंत बघेले व रफिक शेख यांनी आशिष निखाडे व शिवकुमार यांना मारहान केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने आशिष निखाडे व शिवकुमार यांना विटां फेकुन मारल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आशिष निखाडे याच्या बरगळीचे हाड तुटले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याने सकाळीच आमचेविरूध्द पोलिस ठाण्यात तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमचेविरूध्द सकाळी फिर्याद दाखल केली म्हणुन माझे पतीच्या सांगण्यावरून त्यांच्यावर होवु घातेलेल्या कार्यवाहीच्या भितीमुळे मी प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे.

४.       पोलिसांनी माझे बयाण नोंदविले होते. पोलिसांना फिर्याद व बयाण देतेवेळी आरोपी निगम याने विट फेकुन मारली होती ही बाब मी सांगितली होती. आशिश, सागर व हेमु यांनी माझे केसं ओढले होते ही बाब मी पोलिसांना फिर्याद व बयाण देतेवेळी सांगितली होती. सागर याने माझी साडी खेचली होती ही बाब मी पोलिसांना फिर्याद व बयाण देतेवेळी सांगितली होती. आशिष निखाडे यांनी तुम्ही आमचे काहीही करू शकत नाही अशी धमकी दिली होती, ही बाब मी पोलिसांना सांगितली होती. आता मला माझी फिर्याद व बयाण वाचुन दाखविण्यात आले. सदरच्या बाबी माझ्या जबाबात दिसुन येत नाही. मी सांगितल्यानंतर सुध्दा पोलिसांनी फिर्याद व जबाबाबत का नमुद केले नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

५.       हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनेच्यावेळी माझे पती घरी हजर नव्हते. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, ते आंघोळ करत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना घटनेसंबंधी काही माहीत नाही. रफिक व जयंत हे पुन्हा दुपारी १२.०० वाजता आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व आरोपीचा वाद असल्यामुळे मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याविरूध्द फिर्याद दाखल केल्यामुळे त्यांना प्रस्तुतच्या खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आलेले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. ११.०९.२०२५ | दि.११.०९.२०२५ |